# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/२९७/२०२३-२४ दिनांक : २६/०६/२०२३

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १) अनिल बि.भोसले (भारतीय जनता पार्टी) यांचे दि.१४/०६/२०२३ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | काटेरी चिंच | १० ते १५ फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड हरहरमहादेव वे.सोसायटी, गगनगिरी -२, काशिगांव, मिरारोड (पु) येथिल असून झाड घरामध्येच आहे.वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या सतत पडत असतात, तसेच घरातच झाड असल्यामुळे उंदीर साप यासारखे प्राणी झाडावरुन घरात येत असतात.त्यामुळे भितीचे वातावरण कुटुंबामध्ये निर्माण झाले आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २) कमर पॅलेस को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.०२/०६/२०२३ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | आंबा | ३० ते ३५ फुट | ०१ | १३ वर्ष | सदरचे झाड कमर पॅलेस को.ऑ.हो.सो.लि.प्लॉट नं २८८३०, स्टेशन रोड, अजिजीया मस्जिद,मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून संरक्षण भिंतीवर धोकादायकरित्या वाढले आहे.तसेच पंपरुम वर पडले आहे. त्यामुळे पंपरुम व संरक्षण भिंतीला तडा गेला आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | नारळ | ३० ते ३५ फुट | ०१ | १७ वर्ष | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

Gunijan

(योगेश गुणिजन)
सहाय्यक आयुक्त
तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

2023-2024. Sadar -Permission